REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# नागपूर जिल्हयातील फळ उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादन विषयक समस्याचे अध्ययन

प्रा. निशिता राहूल अंबादे
सहायक प्रध्यापक, सेठ केसरीमल पोरवाल कला आणि वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कामठी

## सारांश

प्रस्तुत विषय हा शेतक-यांशी संबंधित असल्यामुळे एकुण उत्पादनापैकी फळ उत्पादनाचा वाटा किती? तसेच हया उत्पादनामुळे शेतक-यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीवर काय परिणाम झालेला आहे. याचाही अभ्यास प्रस्तुत विषयाद्वारे करण्यात आला आहे. हया विषयाचे अध्ययनासाठी नागपूर जिल्हा हे कार्यक्षेत्र निश्चित केले असून २०१८-२०१९ हा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे.



## प्रस्तावना

शेती व्यवसाय हा जगातील अत्यंत महत्वाचा पुरातन व्यवसाय आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीला महत्वपूर्ण स्थान आहे कृषीच्या विकासा-शिवाय मानवी जीवन कधीही सुखी व समृद्ध होऊ शकणार नाही. मानवाची अन्नफळयाची गरज कृषीमार्फतच पूर्ण होऊ शकते. उद्योगांना आवश्यक असणा-या कच्चामालाचा पुरवठा सुद्धा शेतातूनच होत असतो. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या खेड्यात राहत असून शेती हा त्याचा प्रमुख व्यवसाय आहे. भारताच्या लोकसंख्येपैकी जवळजवळ ७२ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. खेड्यातील बहुतांश लोकांचे शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. शेती व शेतीशी संलग्न असलेले व्यवसाय जसे पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कूटपालन इत्यादीचा एकत्रित विचार केल्यास जवळ जवळ ८० टक्के लोकसंख्या कृषी आणि संलग्ण व्यवसायावर अवलंबून असल्याचे दिसून येते. राजकारणापासून तर अर्थकारणापर्यंत सर्व क्षेत्रात कृषि उत्पादनाचे अत्यंत महत्व आहे. नागपूर जिल्हयातील शेतकरी गेल्या कित्तेक वर्षापासून सोयाबिन, गंहू, ज्वारी इ. पिकांच्या उत्पादनाबरोबरच विविध फळाला सुद्धा अधिक महत्व देतांना दिसून येते.

कारण या पिकासाठी आवश्यक असणारे वातावरण तसेच या पिकाला लागणारे बी–बियाणे व इतर सोयीसुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे शेतक–यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून येण्यास मदत होते. परंतु या पिकांसाठी आवश्यक असणारे पुरेशी बाजारपेठ उपलब्ध नसल्यामुळे तसेच दलाल व अडते यांच्याकडून शेतक–यांची पिळवणूक व शोषण थांबविण्यासाठी तसेच बाजारपेठेतील फाळांच्या किंमतीमध्ये होणारा चढउतार यासारख्या अनेक प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी संशोधनकर्त्तीने प्रस्तुत विषय निवडला आहे.

**सारणी क्र. १ फळ उत्पादकांना येणाऱ्या उत्पादन विषयक समस्येसंबंधी माहिती संकलित केली असता खालील माहिती प्राप्त झाली.**

| उत्पादन विषयक समस्या | होय | प्रतिशत प्रमाण | नही | प्रातिशत प्रमाण | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| भांडवलाची / वित्तीय समस्या | २२८ | ६५.१% | १२२ | ३४.९% | ३५० |
| बियाणे उपलब्धता | २५८ | ७३.७% | ९२ | २६.३% | ३५० |
| खते व किटनाशके उपलब्धता | २१४ | ६१.१% | १३६ | ३८.९% | ३५० |
| मजूरांची कमतरता | ३२६ | ९३.१% | २४ | ६.९% | ३५० |
| विद्युत पुरवठा | ९४ | २७.0% | २५६ | ७३.0% | ३५० |
| शेती व्यवस्थापनाबाबत अडचणी | ११५ | ३२.९% | २३५ | ६७.१% | ३५० |
| अपूऱ्या सोई सवलती व सुविधा | २५६ | ७३.३% | ९३ | २६.७% | ३५० |
| विपणन व्यवस्था | २१३ | ६१.0% | १३४ | ३८.३% | ३५० |
| वाहतूक व्यवस्था | १५६ | ४४.६% | १९४ | ५५.४% | ३५० |
| साठवणूकी बाबत समस्या | २१२ | ६0.९% | १३८ | ३९.१% | ३५० |
| प्रमाणीकरण व प्रतवारी बाबत समस्या | १६0 | ४५.६% | १९0 | ५४.४% | ३५० |

आधार :– प्रश्नावलीचे वर्गीकरण

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की, ३५० उत्तरदात्यांपैकी २२८ (६५.१%) उत्तरदात्यांना भांडवल/वित्तीय समस्या येतात. २५८ (७३.७%) उत्तरदात्यांना बियाण्याच्या उपलब्धतेत समस्या येतात. २१४(६१.१%) उत्तरदात्यांना खते व किटकनाशकांच्या उपलब्धतेत समस्या येतात. ३२६ (९३.१%) उत्तरदात्यांना मजूरांच्या कमतरतेचा सामना करावा लागतो. २५६ (७३.३%) उत्तरदात्यांना अपूऱ्या सोई सवलती व सुविधांचा सामना करावा लागतो. २१५ (६१.७%) उत्तरदात्यांना विपणन विषयक समस्या येतात. तर २१३ (६0.९%) उत्तरदात्यांना साठवणूकीबाबत समस्या येत.असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले.

यावरुन स्पष्ट होते की, नागपूर जिल्ह्यातील बहुतांश फळ उत्पादकांना भांडवल/वित्तीय समस्या, बियाण्याच्या उपलब्धतेत समस्या, किटकनाशकांच्या उपलब्धतेत समस्या, मजूरांची कमतरता, अपूऱ्या सोई सवलती व सुविधा, विपणन विषयक समस्या व साठवणूकीबाबत समस्या इत्यादी समस्यांचा सामना करावा लागतो.

**सारणी क्र. २ फळ उत्पादकांना व्यापाऱ्यांकडून मालाचे पैसे मिळण्यास विलंब होतो किंवा नाही हे विचारले असता खालील माहिति प्राप्त झाली.**

| व्यापाऱ्यांकडून मालाचे पैसे मिळण्यास विलंब | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| उत्तरदाते | २११ | १३९ | ३५० |
| प्रतिशत प्रमाण | ६०.३% | ३९.७% | १००% |

आधार :- प्रश्नावलीचे वर्गीकरण

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की, ३५० उत्तरदात्यांपैकी २११ (६०.३%) उत्तरदात्यांना व्यापाऱ्यांकडून मालाचे पैसे मिळण्यास विलंब होतो, तर १३९ (३९.७%) उत्तरदात्यांना व्यापाऱ्यांकडून मालाचे पैसे मिळण्यास विलंब होत नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले.

यावरुन स्पष्ट होते की, नागपूर जिल्ह्यातील बहुतांश फळ उत्पादकांना व्यापाऱ्यांकडून मालाचे पैसे मिळण्यास विलंब होतो.

**सारणी क्र ३ फळ उत्पादकांना बाजारपेठेत सोई सुविधांचा अभाव जाणवतो किंवा नाही हे विचारले असता खालील माहिति प्राप्त झाली.**

| बाजारपेठेत सोई सूविधांचा अभाव | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| उत्तरदाते | २९४ | ५६ | ३५० |
| प्रतिशत प्रमाण | ८४.०% | १६.०% | १००% |

आधार :- प्रश्नावलीचे वर्गीकरण

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की, ३५० उत्तरदात्यांपैकी २९४ (८४%) उत्तरदात्यांना बाजारपेठेत सोईसूविधांचा अभाव जाणवतो, तर ५६ (१६%) उत्तरदात्यांना बाजारपेठेत सोईसूविधांचा अभाव जाणवत नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले.

यावरुन स्पष्ट होते की, नागपूर जिल्ह्यातील बहुतांश फळ उत्पादकांना बाजारपेठेत सोईसूविधांचा अभाव जाणवतो.

नागपूर जिल्ह्यातील बहुतांश फळ उत्पादकांना भांडवल/ वित्तीय समस्या, बियाण्याच्या उपलब्धतेत समस्या, किटकनाशकांच्या उपलब्धतेत समस्या, मजूरांची कमतरता, अपूऱ्या सोई सवलती व सुविधा, विपणन विषयक समस्या व साठवणूकीबाबत समस्या इत्यादी समस्यांचा सामना करावा लागतो. बहुतांश फळ उत्पादकांना व्यापाऱ्यांकडून मालाचे पैसे मिळण्यास विलंब होतो. बहुतांश फळ उत्पादकांना बाजारपेठेत सोईसूविधांचा अभाव जाणवतो.

## निष्कर्ष

नागपूर जिल्हयातील फळ उत्पादक शेतक-यांच्या अभ्यास करतांना असे आढळून आले की उत्तरदात्यांची स्थिती समाफळकारक असली तरी फारशी चांगली नाही. त्यांच्या राहणीमानाचा दर्जा पाहिजे तितका उंचावलेला नाही त्यांमुळे उत्तरदात्याच्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम सामाजिक जीवनावर विशेष झाला असे आढळून येते. जिल्ह्यातील बहुतांश फळ उत्पादकांना भांडवल / वित्तीय समस्या, बियाण्याच्या उपलब्धतेत समस्या, किटकनाशकांच्या उपलब्धतेत समस्या, मजूरांची कमतरता, अपूऱ्या सोई सवलती व सुविधा, विपणन विषयक समस्या व साठवणूकीबाबत समस्या इत्यादी समस्यांचा सामना करावा लागतो.

## संदर्भ ग्रंथसुची

१. डॉ. आगलावे प्रदिप- संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन नागपूर.
२. डॉ. आगलावे प्रदिप, 'नमुना निवडीचे तंत्र', सामाजिक संशोधन पद्धती, २००७, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
३. डॉ. भांडारकर- रिसर्च मेथॉडॉलॉजी इन सोशिअल सायंस
४. डॉ. कविमंडन विजय- कृषी अर्थशास्त्र
५. डॉ. बोधनकर, सुधीर, अलोगी विवेक- सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन २०१३
६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन- नागपूर
७. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, नागपूर
८. जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख नागपूर
९. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय नागपूर
१०.जिल्हा ऋतु व पिके अहवाल-वार्षिक अहवाल २००२ते २०११
११.पशुगणना-२००१ आणि २०११
१२.प्रत्यक्ष शेतक-याची मुलाखत, निरीक्षण व चर्चा